# नोस्टालजिया 2

**प्रशांत दांडेकर**



# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# नोस्टाल्जिया-२

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# नोस्टाल्जिया-२

लेखक

## प्रशांत दांडेकर

# नोस्टाल्जिया-२

## लेखक: प्रशांत विजय दांडेकर

इमेल - prashant.dandekar@rediffmail.com

मोबाईल - ९८२१९४७४५७

पत्ता - २ जानकी कुंज

महादेव विष्णू पांडालोस्कर मार्ग

विले पार्ले - पूर्व - मुंबई - ४०००५७

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

Whatsapp: 7710980841

**प्रकाशन : २१ डिसेंबर २०२० (अमीन सयानी जन्मदिन)**

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे- आवश्यकआहे.

ओळख



प्रत्येकाचे कोणीतरी आवडते लेखक किंवा कवी असतातच; माझ्यापुरते बोलायचे झाल्यास शिवाजी सावंत यांचे मृत्युंजय हे पुस्तक नॉस्टॅलजियाचे फ़ीलिंग निर्माण करते.

इतरांची पुस्तके वाचता वाचता मला देखील लिहिण्याची उर्मी आली; अनेक वर्षे मी **लोकसत्ता, आपलं महानगर, प्रहार व मुंबई चौफेर या वृत्तपत्रांमध्ये** लिहीत आहे; बालसाहित्य, व्यवस्थापन क्षेत्रामधील सॉफ्ट स्किल्स, चित्रपट सृष्टीमधील व्यक्तिमत्त्वांच्या मुलाखती व जगात साजऱ्या केल्या जाणाऱ्या विविध दिवसांबद्दल लिहीत असताना लेखक म्हणून मी देखील प्रगल्भ होत गेलो. आजवर ५०० लेखांचा टप्पा मी कधी ओलांडला हे मला देखील कळलेच नाही.

**'लोकप्रभा' सारख्या साप्ताहिकांमध्ये** मी २०१४ मध्ये मराठी भाषेचे सौंदर्य व २०१६ मध्ये कॉर्पोरेट मॅनेजमेंट या

विषयांवर वर्षभर लेखमाला लिहिल्या तर **पोलिसांचे मासिक 'दक्षता'** मध्ये देखील अडीच वर्षे सातत्याने लेखन केले.

व्यवस्थापनामधील किचकट इंग्रजी संज्ञा मुलांना सहज कळाव्यात म्हणून मी **'व्य'** नावाचे व्यवस्थापन क्षेत्रावर एक पुस्तक लिहिले ज्याचे प्रकाशन तत्कालीन शिक्षण मंत्री श्री विनोद तावडे यांच्या हस्ते करण्यात आले होते.

भारतरत्न लता दीदी यांनी २०१९ मध्ये वयाची ९० वर्षे पूर्ण केली त्यामुळे त्यांच्या कारकिर्दीवर भाष्य करणारे **'लता ९०'** हे पुस्तक रवींद्र नाट्य मंदिरामध्ये प्रकाशित करण्यात आले; या पुस्तकाचे उदघाटन १० मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले ज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भावगंधर्व हृदयनाथ मंगेशकर, सुलोचना दीदी, जॅकी श्रॉफ, संगीतकार कल्याणजी आनंदजी अशांचा समावेश होता; या पुस्तकामध्ये मी मान्यवरांच्या घेतलेल्या १३ मुलाखती /लेख समाविष्ट करण्यात आले होते; आशा पारेख, वैजयंतीमाला व हेमामालिनी या नृत्यांगना, प्रसिद्ध पटकथा लेखक सलीम खान, शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे इत्यादींच्या मुलाखती घेत असताना या पुस्तकाची प्रस्तावना भारतरत्न सचिन तेंडुलकरांकडून घेण्याचे सौभाग्य देखील मला मिळाले.

सध्या मी तीन पुस्तके लिहून पूर्ण केली आहेत जी योग्य प्रकाशकाच्या शोधात आहेत; **भारतीय पक्षी, भारतीय फुले व लैंगिक अत्याचार प्रतिबंध आणि महिला सक्षमीकरण** या तीन विषयांवर ही पुस्तके आहेत.

आदिवासी क्षेत्रातील मुलांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी व आरोग्य संगोपनासाठी निधी संकलन करण्याच्या हेतूने प्रसिद्ध व्यक्तिमत्वांवर एक कॉफी टेबल बुक काढण्याचे ड्रीम प्रोजेक्ट माझ्या मनात आहे; त्यासाठी आपल्या सारख्या रसिकांच्या भरघोस प्रतिसादाची अपेक्षा आहे.

प्रशांत दांडेकर

९८२१९४७४५७

# मनोगत

अमीन सयानी यांच्या जन्मदिनी, नॉस्टॅल्जियाचा हा दुसरा भाग सादर करताना मला खूप आनंद होत आहे; साहजिकच आहे, पहिल्या भागाला आपले उदंड प्रेम व कौतुक मिळाल्यामुळे सिक्वेल काढण्याची प्रेरणा मिळणारच होती. 'नॉस्टॅल्जिया चा मराठी अर्थ काय?' असा प्रश्न विचारणाऱ्यांना 'स्मरण रंजन' असा मायबोलीतील शब्द सुचविला खरा पण आता मात्र नॉस्टॅल्जिया हाच शब्द दुसऱ्या भागासाठी ठेवावा असे अनेक जणांचे मत पडले आहे; शेवटी कंटिन्यूटी असणे अनेकांना आवडणार आहे कारण त्यांना भाग एक दोन असे एकत्र करून नॉस्टॅल्जिया पुस्तक (हार्ड कॉपी) स्वरूपात यावे असे मनोमन वाटत आहे.

असो; देश विदेशातून वाचकांचे हजारो फोन आले, इमेल्स आल्या, व्हॉट्सअप मेसेज देखील आले पण आता वाचकांनी एक पाऊल पुढे टाकावे म्हणून इथे एक सूचना करत आहे; सध्या पत्र लेखन संस्कृती लयाला जात आहे तेव्हा वाचकांनी पत्र रूपात प्रतिसाद द्यावा अशी विनंती करत आहे.

प्रत्येकामध्ये एक संवेदनशील कलाकार दडलेला असतो; कधी तो कवी होतो तर कधी चित्रकार; कधी कथाकार होतो; तर कधी गायक -वादक देखील. यातले काही जण दिलखुलासपणे जगासमोर व्यक्त होतात तर काही आपल्या कोषातच (जगाला आपले काम /कलाकृती आवडली नाही तर या भीतीपोटी) राहतात; या दोन्ही वर्गांना प्रोत्साहित करण्यासाठी मी अजून एक विनंती करत आहे की पत्रासोबत त्यांची कलाकृती देखील मला पाठवावी.

ट्रॅफिक 'टु वे' असले की त्याची मजा काही औरच असते नाही ! 'टु वे ट्रॅफिक'ची सुरुवात श्रीमती सरिता वाकळकर यांनी त्यांनी लिहिलेले पुस्तक पाठवून केली आहेच.

या भागामध्ये जे विषय घेतले आहेत ते देखील तुम्हाला भूतकाळाची सफर घडवून आणतील याची मला खात्री आहे; विशेषतः लता व आशा या सुरेल भगिनींनी गायलेल्या गीतांवर लिहावे या वाचकांच्या सूचनेचा इथे मान राखला गेला आहे; आपल्या सैनिकांवर देखील लिहा अशी माझ्या मनातील भावना देखील वाचकांनी मांडली होती; त्यावर नक्की तिसऱ्या भागामध्ये लिहीन.

नॉस्टॅल्जिया मुळे मला काय मिळाले हे सांगणे 'शब्दांच्या पलीकडले' आहे; माझ्या वडिलांना शिकविणाऱ्या शिक्षकांशी झालेला संपर्क, माझ्या चुलत बहिणीचा  शाळेतील वर्ग मित्र, त्याचा माझ्या बहिणीशी झालेला संपर्क; अशा अनेक भूतकाळातील मिसिंग लिंक्स जोडल्या गेल्या.

अनेक दिग्गजांच्या सहवासात येण्याचे भाग्य मिळाले; उदाहरण द्यायचे झाल्यास गुलजार यांचे शिल्प बनविणारे 'भगवान रामपुरे' , दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाचे ट्रस्टी 'धनंजय गोखले', पालघरच्या नगराध्यक्षा, उज्ज्वला काळे आणि इतर अनेक जण !

चला तर मग ऋणानुबंधाच्या नवीन रेशीम गाठी बांधूया व तुम्हा सर्व वाचकांना माझ्यातर्फे नववर्षाच्या शुभेच्छा व नॉस्टॅल्जिया -२ च्या रूपात एक सुरेल भेट !

आपल्या प्रतिक्रियांच्या प्रतिक्षेमध्ये आतुर असलेला –

----- प्रशांत दांडेकर.

९८२१९४७४५७

# अर्पण पत्रिका

नॉस्टॅल्जिया हे पुस्तक कोणाला अर्पण करायचे असा जेव्हा विचार मनात आला तेव्हा अनेकांची नावे डोळयासमोर आली; त्यात माझे असंख्य मित्र होते; अनेक सुरेख चित्रपटगीतांचे गीतकार होते व काही निर्जीव व तरीदेखील खूप काही बोलणाऱ्या वस्तू होत्या; निसर्ग ज्याची विविध रूपे आपल्याला मोहित करतात त्याला देखील हे पुस्तक अर्पण करणे सयुक्तिक ठरेल.

माझ्या आजोळच्या समुद्राला (उंबरगाव), माझ्या जानकी कुंज बिल्डिंगच्या गच्चीला, गुलजार सारख्या प्रतिभावंत गीतकाराला हे पुस्तक अर्पण करताना मला खरंच आनंद होत आहे कारण गुलज़ारजींच्या भाषेत सांगावयाचे झाल्यास नॉस्टॅलजिया म्हणजे 'मेरा कुछ सामान तुम्हारे पास पडा है, सावन के कुछ भीगे भीगे दिन रखे हैं; और मेरे एक ख़त में लिपटी रात पडी हैं, वो रात बुझा दो, मेरा वो सामान लौटा दो.'

# Contents


सिगरेट

कॉलेज

छेडछाड

पायरी

ऑफिस रोमान्स

रात्र

नृत्य

आंधळा मागतो एक डोळा

# सिगरेट

'सिगरेट' व 'बासरी' या दोन गोष्टी आपल्यापेक्षा जास्त वेळ प्रियकराच्या ओठांजवळ असतात अशी प्रेमळ तक्रार  पूर्वीच्या काळी  बऱ्याच प्रेयसींची असायचीआणि ते पूर्वीच्या काळी सत्य देखील असायचे कारण अशासाठी की, त्यावेळी सिगारेट ओढणे हे मर्दानगीचे प्रतीक होते व इलेक्ट्रॉनिक वाद्यांचा जमाना चालू न झाल्याने पारंपरिक वाद्ये वाजविण्याकडे मुलांचा कल जास्त असायचा.

त्याकाळी तरुणाई मध्ये सिगारेटच्या पहिल्या झुरक्याबद्दल खूप अप्रूप असायचे; टवाळ / बॅकबेंचर सोडले तर बरीच मुले पहिला झुरका कॉलेज जीवनामध्ये घ्यायचे; सिगरेट ओढणारा मुलगा तेव्हा मर्दानीचे प्रतीक समजले जायचे; जनमानसावर अधिराज्य गाजविणाऱ्या चित्रपटांमधून हेच समाजावर बिंबविले गेले.

सिगरेट म्हटले की एकच गाणे डोळ्यासमोर सर्वप्रथम येते व ते म्हणजे 'हम दोनो' मधील देव आनंद व त्याचा तो म्युझिकल लायटर; ते धुरांचे वलय सोडत ' मैं जिंदगी का साथ निभाता चला

गया' असे बेफिक्रीमध्ये गाणारा देव व पाण्यात प्रतिबिंबित होणारा रुपगर्विता साधनाचा मोहक चेहरा; हाच चेहरा जेव्हा देवला सिगरेट फेकून द्यायला प्रवृत्त करतो तेव्हाच प्रेयसी व सिगारेटमधील द्वंद्व अधोरेखित होते.

दुसरे आठवणीतले गाणे म्हणजे ट्रेंड सेंटर झालेले, हिप्पी संस्कृतीचे दर्शन घडविणारे 'दम मारो दम' हे गाणे; या गाण्यामध्ये सिगारेटच्या बहिणी चिलीम, चिरूट सगळ्याजणीच दर्शन देऊन जातात. हे गाणे पंचम ने बनविले खरे; पण त्यांचे पिताश्री सचिन देव बर्मन यांचे पित्त मात्र खवळले; अभिजात शास्त्रीय संगीत व भारताच्या मातीतील संगीत देणाऱ्या माझ्या पोटी असा करंटा कसा काय जन्मला असे त्यांना त्या क्षणी वाटले होते पण कालांतराने या गाण्याच्या यशाने सचिनदा यांचा राग काही प्रमाणात निवळला. आजकाल बॉलिवूडचे नायक नायिका तणाव मुक्तीच्या सबबीखाली ड्रग्स युक्त स्पेशल सिगारेट्स मध्ये अडकल्याचे दुर्दैवी चित्र समोर आल्यामुळे 'दम मारो दम' हे गाणे काळाच्या किती पुढे होते याची प्रचिती येते.

काही जणांना टेन्शन आले की सिगारेट ओढायची सवय असते बहुदा याच मानसिकतेचा वापर 'गुमनाम है कोई' या गाण्यामध्ये करण्यात आला आहे; एका निर्जन बेटावर अडकल्यावर सर्व पुरुष कलाकार सिगार, सिगारेट, चिरूट ओढत

ओढत काही मदत मिळत आहे का हे पाहण्यासाठी वणवण भटकत असताना या गाण्यात दाखविले आहेत.

हावडा ब्रिज मधील 'आईये मेहरबान' हे गाणे देखील कोण बरे विसरेल; मधुबाला अशोककुमार ला आपल्यासोबत डान्स साठी बोलाविण्यासाठी जाते तेव्हा अशोक कुमारच्या हातातील पेटती सिगरेट अशा रीतीने विझवते की समोर बसलेल्या के एन सिंग चा जळफळाट अजूनच वाढेल. क्लब सॉन्ग म्हटले की मदहोश नृत्य, कमनीय डान्सर व सिगारेटचे झुरके ही त्रिसूत्री हिंदी चित्रपट संगीतामध्ये ठरलेली असायची; याचे अजून एक उत्तम उदाहरण म्हणजे 'आर पार' चित्रपटामधील 'बाबूजी धीरे चलना' हे गाणे.

'जब भी कोई कंगना बोले' या 'शौकीन' चित्रपटामधील गाण्यामध्ये अशोक कुमार यांनी रंगेल म्हाताऱ्याची भूमिका मस्त वठवली आहे, हातात सिगारेट, आपल्याच तालावर नाचत, बायकोच्या उपस्थितीची जरा देखील दखल न घेणारा, दूरचा चष्मा वारंवार डोळ्यांवर लावून रस्त्यावरील ललनांना पाहणारा बेरकी म्हातारा बघणे म्हणजे अनेकांना आपले अपूर्ण स्वप्न डोळ्यासमोर आल्याचे नॉस्टॅल्जीक फिलिंग देऊन जाते.

अशोक कुमार व सिगारेट म्हटले की अजून एक हळवे गाणे आठवते व ते म्हणजे 'ममता' चित्रपटामधील 'छुपा लो यूँ दिल में प्यार मेरा के जैसे मंदिर में लौ दीए की'; खरे तर या गाण्यामध्ये उदात्त

त्याग व प्रेम भावना आहेच पण साधूच्या आवाजासारखा धीर गंभीर व पवित्र भासणारा हेमंत कुमार यांचा स्वर देखील आहे; या गाण्यामध्ये खरे तर सिगारेट चा तसा काहीच रोल नाही आहे.

‘अंगूर’ चित्रपटामध्ये एक सुंदर गीत आहे 'रोज रोज डाली डाली, क्या लिख जाए भंवरा, बावरा' या गाण्यात दीप्ती नवल स्टेज वर गाणे गात असते व समोर संजीव कुमार असतो; समोर बसलेले आपले जिजाजी सिगारेट पीत आहे हे पाहून दीप्ती विचलित होते व तिच्या हातामधून माईक सटकतो असा तो शॉट होता. प्रत्यक्षात तो दीप्तीच्या जिजाजींचा जुळा भाऊ असतो, ‘अंगूर’ चित्रपटामध्ये एक नाही तर दोन डबल रोल (संजीव कुमार आणि देवेन वर्मा) असा एक धमाकेदार कथानकाचा प्लॉट आहे; या गाण्यात गुलजार आणि आशा यांची केमिस्ट्री अफलातून जमून आली आहे.

‘वक्त’ चित्रपटामध्ये एक सुंदर गीत आहे; 'चेहरेपे खुशी छा जाती है' यात राजकुमार व सुनील दत्त दोघे ही साधनाच्या सौंदर्याने घायाळ झालेले दाखविले आहेत; सुरुवातीला राजकुमार ऐटीमध्ये सिगारेटचे झुरके घेताना दाखविले आहे पण जसजसे त्याला कल्पना येऊ लागते की साधनाचा परिकथेतील राजकुमार तो नाही तर सुनील दत्त आहे तेव्हा तो सिगारेट प्यायचेच विसरून जातो.

त्याकाळी मर्दानगीचे प्रतीक असल्याने प्रियकराने सिगरेट ओढणे व त्याचा धूर त्याने आपल्या चेहऱ्यावर सोडणे यात

प्रेयसीला मोठे अप्रूप वाटायचे; ह्याचेच दर्शन 'आपके आँखोंमे कुछ महके हुए से राज़ है' या गाण्यात होते; हे गाणे अर्थातच गच्ची या प्रकरणामध्ये आधीच रसिकांच्या भेटीला आले आहे; सिगारेट पिणे जितके रोमँटिक असायचे तेवढेच; किंबहुना थोडे अधिकच रोमँटिक, सिगारेट च्या धुराची वलये काढत मुलींना इम्प्रेस करणे असायचे.

स्वतः सिगरेट शिलगावून ती प्रियकराच्या ओठांवर ठेवायची क्रेझ पण त्याकाळी असल्याने 'दिवार' चित्रपटामध्ये परवीन बाबी अमिताभला सिगरेट शिलगावून देत असल्याचे दृश्य आहे; त्याकाळी भारतामध्ये स्त्रियांनी सिगरेट ओढणे हे अधःपतनाचे प्रतीक असल्याने 'पूरब पश्चिम' चित्रपटामध्ये सायराबानोला धूम्रपान करताना दाखविले आहे; गाणे अर्थातच 'है प्रीत जहाँ की रीत सदा'

'हाथ की सफाई' या चित्रपटामध्ये प्रियकराने दुखावले म्हणून प्रेयसी प्रियकराला डिवचण्याचा प्रयत्न करते व पार्टीमध्ये अनेकांना स्वतः च्या हाताने दारू पाजते व सिगरेट चे झुरके ऑफर करते; 'तू क्या जाने बेवफा' या गाण्यात हेमामालिनी जशी भाव खाऊन गेली तसाच खलनायक म्हणून विनोद खन्ना!

नंतर असा देखील काळ आला की प्रेयसी प्रियकराला अट घालू लागली की आपल्या लग्नानंतर तू दारू व सिगरेट सोडून

द्यायची; अशी अट पाळणारा मित्र ग्रुप मध्ये असल्यास इतर मित्र लगेच म्हणायचे, "चला वहिनींनी वाघाचे मांजर केले तर तुला." त्यात एखादा मित्र असायचा जो मित्रांसोबत सिगरेट तर ओढायचा पण बायकोला कळू नये म्हणून मग वेलची खा, पेपरमिंट खा असे उद्योग करायचा; पण तुम्हाला तर माहीतच आहे महिला वर्ग या बाबतीमध्ये शेरलॉक होम्सच्या आई असतात.

जुन्या काळी घरगुती हिंसाचाराची सुरुवात कधी कधी महिलेला जळत्या सिगारेटचे चटके देऊन व्हायची त्यामुळे या अर्थाने हि सिगारेट अत्याचाराचे देखील प्रतीक होती.

कालांतराने मुलींनी सिगरेट ओढणे हे स्त्री मुक्तीचे प्रतीक बनले व खास स्त्रियांसाठी बाजारात वेगळ्या सिगारेट्स आल्या व त्याची जाहिरात खुद्द दीप्ती नवल सारख्या अभिनेत्रीने केल्याने त्याकाळी खूप मोठं गहजब माजला होता. आता तर खास करून आय टी कंपन्यांच्या प्रिमायसेस बाहेर मुलं मुली एकत्र सिगरेट ओढताना सर्रास दिसू लागली आहेत त्यामुळे चित्रपटामधून खलनायिकेला सिगरेट ओढताना दाखविणे वगैरे मेलोड्रामा कधीच मागे पडला आहे.

जुन्या काळी वडील किंवा काका इतकेच काय शेजारच्या काका, काकूंना पत्ता न लागू देता पानपट्टीवर सिगरेट ओढणे म्हणजे मोठे दिव्य असायचे; त्यात जर कडकी असेल तर एकच सिगरेट

दोन तीन मित्रांमध्ये ओढली जायची व मैत्रीचे धागे अजून पक्के केले जात असतं; मला आजोबा त्यांच्यासाठी सिगरेट आणायला पानपट्टीवर पाठवत पण सोबत दोन पैसे पण देत; ज्यात पानाच्या स्वादाच्या दोन गोळया मला खायला मिळत. माझा सिगारेट्सशी संबंध आला तो आजोबांच्या पनामा सिगरेट आणण्याइतपतच!

लग्नाचा मोठा तोटा म्हणजे प्राणप्रिय सिगरेट सोडावी लागली असे जेव्हा एखादा मध्यमवयीन पुरुष आजही म्हणतो तेव्हाच सिगरेट बद्दलचा त्याचा नॉस्टॅल्जिया अधोरेखित होतो; नाही का!;सिगरेट मुळे कॅंसर चा धोका असल्याने मला इथे मुद्दामहून सांगावेसे वाटते की सिगरेट ही आठवणीतच राहिलेली जास्त चांगली.

# कॉलेज

कॉलेज म्हटले की प्रत्येकाच्या मनात अनेक आठवणी फेर धरू लागतात ; शाळेतून कॉलेजमध्ये पहिले पाऊल ठेवताना अनेकांच्या मनामध्ये भीती असते ती रॅगिंगची तर काहींच्या मनामध्ये मात्र आनंदाचा मोर थुई थुई नाचत असतो; कारण साहजिकच युनिफॉर्म पासून सुटका, मनात येईल तेव्हा लेक्चर बंक करण्याचे स्वातंत्र्य व अजून बरेच काही.

कॉलेज मधील विविध डेज असो की कॉलेज मधील विविध महोत्सव तिथे अनेकांच्या प्रेमाला पहिला अंकुर फुटतो व याचे वर्णन अनेक चित्रपट गीतांमध्ये आले आहे; प्रकर्षाने आठवणारी काही गाणी म्हणजे 'मेरे मेहबूब' मधील टायटल सॉन्ग; 'मेरे मेहबूब तुझे मेरी मोहब्बत की कसम' किंवा 'खिलाडी' चित्रपटामधील 'खुदको क्या समझती है'; त्यातील खिलाडी च्या गाण्याला थोडीफार रॅगिंगची छटा व प्रेमात 'पहले तकरार, बादमें प्यार' या फिलॉसॉफीची किनार आहे

मी असे अनेक जण पाहिले आहेत की जे कॉलेजच्या पहिल्याच दिवशी पोरगी पटवतात तर काही जण कॉलेजची दोन

तीन वर्षे संपवून कॉलेज मधून बाहेर पडण्याची वेळ आली तरी आपले प्रेम प्रेयसीकडे व्यक्त करू शकत नाहीत.

आमच्या काळी बऱ्याच शाळांमध्ये मुले व मुली एकत्र शिकायचे पण शिस्तीच्या नावाखाली दोघांमध्ये एक – दोन शब्दाचे देखील संभाषण होत नसे; अशा वातावरणात वाढलेल्या मुलांसाठी कॉलेजमधील मैत्रीचे पहिले काही दिवस म्हणजे खऱ्या अर्थाने मुलींच्या सहवासात येण्यासाठी उचलले गेलेले पहिले पाऊलच!; जे मुलांच्या बाबतीत तेच मुलींच्या बाबतीत काही अंशाने खरे असायचे.

कॉलेजमध्ये ग्रुप तयार होण्याची दोन तीन मुख्य ठिकाणे असायची; तुम्ही सायन्सला असला तर प्रयोगशाळेमध्ये प्रॅक्टिकल पार्टनर म्हणून प्रथम एखादा मित्र किंवा मैत्रीण मिळते, आर्टस् ला असला तर एकांकिका बसविण्याच्या निमित्ताने ऑडिटोरियम मध्ये झालेली जान पहचान व तिसरे ठिकाण अर्थातच कँटीन.

'साथ साथ' चित्रपटामध्ये एक गाणे आहे 'तुमको देखा तो ये खयाल आया; जिंदगी धूप तुम घना साया' यामध्ये कॉलेजच्या कॅन्टीन व लायब्ररीमध्ये मित्रांच्या संगतीमध्ये फारुख शेख व दीप्ती नवल मधील प्रेम फुलताना सुरेख रित्या दाखविले आहे. ऋषी कपूर व नीतू कपूर वर चित्रित झालेले 'हमने तुमको देखा; तुमने हमको देखा' ह्या गाण्यामध्ये सांस्कृतिक कार्यक्रमामधून फुलणारे

कॉलेजमधील प्रेम आपल्यासमोर आले आहेच; पण माझ्या पुरते बोलायचे झाल्यास 'धूल का फुल' चित्रपटामधील कॉलेजच्या गॅदरिंग मधील 'तेरे प्यार का आसरा चाहता हूं' ही जुगलबंदी म्हणजे माझे ऑल टाईम फेवरेट गाणे आहे.

'मैं पल दो पल का शायर हूँ' अशी शायरी गॅदरिंग मध्ये सादर करत प्रेयसीला कॉलेज जीवनामध्ये इम्प्रेस करणारे अनेक जण माझ्या पाहण्यात आले आहे; आणि मुलींना देखील अशा कलावंत हळव्या मुलांकडे आकर्षित व्हायला नक्कीच आवडते हे देखील मी पाहिले आहे

कॉलेज मधील धुसमुसळा प्रणय पाहायला मिळाला तो एक दुजे के लिये या चित्रपटामधील वासू आणि सपना वर चित्रित झालेल्या 'मेरे जीवनसाथी प्यार किये जा' या गाण्यामध्ये; लिफ्ट दोन मजल्यांच्या मध्ये थांबवून प्रेमी युगुलाने घातलेला गोंधळ प्रेमामधील उत्कटता दाखवायला पुरेशी होती.

बरेचदा कॉलेज मधील प्रेमप्रकरणे ही सहलीच्या वेळी जास्त बहरास येतात; बहुदा निसर्गाच्या सानिध्यात प्रेमाला अंकुर सहजपणे फुटू शकतो; असेच काहीसे 'वक्त' चित्रपटामध्ये श्रीमंत शर्मिला व गरीब शशी कपूर मध्ये झालेले पाहण्यास मिळते; 'दिन है बहारके तेरे मेरे प्यारके' ह्या गाण्यात निसर्गाच्या पार्श्वभूमीवर कॉलेजमधील मुलांमुलीचे प्रेम खुलताना दाखविले आहे.

माझे पहिले कॉलेज पार्ले कॉलेज (आताचे साठ्ये) होते व माझा विषय मायक्रो बायोलॉजी होता; जिथे आम्ही मोजकेच २० – २५ जण होतो; त्यात मुले ५ व बाकी सर्व मुलीच; आमच्या स्टडी टूर्स जायच्या त्या पण खूपच अनरोमॅण्टीक ठिकाणी (जसे की दादर मलनिस्सारण प्रकल्प / न्यूझीलंड डेअरी) पण त्यावर आम्ही उपाय शोधून काढला होता तो प्रायव्हेट सहलींचा; तुंगारेश्वरला आम्ही सर्वांनी पावसाळी सहल काढली होती; ज्याच्या आठवणी आज देखील सुखद अनुभव देऊन जातात.

पार्ल्यात नुकतेच ‘शान’ नावाचे थिएटर चालू झाले होते व तिथे ‘शान’ चित्रपट लागला होता; आम्ही मुलांनी बळजबरीनेच मुलींना देखील मॅडमचे लेक्चर बंक करायला लावले व सर्व जण त्या चित्रपटाला गेलो होतो; साहजिकच दुसऱ्या दिवशी कॉलेजमध्ये हल्लाकोळ माजला; कारण असे प्रथमच होत होते; त्यावेळी मॅडम म्हणाल्या, “अरे मी ७ महिन्यांची गर्भवती आहे; मला आधी सर्व गोष्टींची कल्पना दिली असती तर मी देखील आराम केला असता.” आम्हाला आमची चूक कळली व मग आम्ही कधीच असा बंक मारला नाही.

कॉलेज म्हटले की त्याच्याशी निगडित अनेक गोष्टी निर्माण होतात व नंतर प्रसिद्ध होतात; उदाहरण द्यायचे झाल्यास रुईया कट्टा किंवा कीर्ती वडापाव किंवा एखादा नाट्यमहोत्सव!

पार्ले कॉलेज त्यावेळी प्रसिद्ध झाले होते ते माधुरी दीक्षित मुळे; तिचा तेजाब चित्रपट तुफान हिट झाला होता; ती पार्ले कॉलेज ची विद्यार्थिनी व त्यात मायक्रो बायलॉजीची; त्यामुळे आमची कॉलर उगाचच टाईट झाली होती; तसे देखील अजिंक्य देव, मधू सप्रे (मिस युनिव्हर्स उपविजेती) अशा अनेकांमुळे आमचे कॉलेज चर्चेमध्ये असायचे.

त्याकाळी नामवंत कॉलेजेस मध्ये प्रवेश घेण्यासाठी चुरस असायची त्यामध्ये रुपारेल, सेंट झेविअर्स, एन एम, रुईया व आमचे कॉलेज आघाडीवर असायचे कारण प्रत्येक मुलाला असे वाटायचे की यापैकी एखाद्या  कॉलेज मध्ये प्रवेश मिळाला की 'पापा कहते है बडा नाम नाम करेगा' हे स्वप्न सत्यात उतरणारच!

कॉलेज म्हटले की मला आठवणारी अजून एक घटना म्हणजे आमच्या कॉलेजची विद्यार्थींनी असलेल्या मुलीला हुंड्यासाठी सासरच्यांनी ठार मारले होते तेव्हा बी डी डी वरळी चाळीत असलेल्या तिच्या सासरी आम्ही तीन ट्रक विद्यार्थी भरून प्रचंड मोर्चा नेला होता.

कॉलेज म्हटले की आठवतात कॅन्टीनच्या असंख्य गोष्टी ज्यात मित्राच्या जीवावर केलेली उधारी, नापास न होता केवळ ए टी के टी वर भागले म्हणून मित्रांनी मागितलेली पार्टी, प्रसंगी मित्रासाठी केलेल्या हाणामाऱ्या! माझा असा अनुभव आहे की कॉलेजमधील

प्रेमप्रकरणे फारशी टिकत नाही पण त्या वयात तशी प्रकरणे असणे भावनिक दृष्ट्या गरजेची असतात. कॉलेजच्या नॉस्टॅल्जीक आठवणींचा पायाच मुळी अशी असफल प्रेमप्रकरणे असतात नाही का!

# छेडछाड

आयुष्यात छेडछाड ला खूप महत्त्वाचे स्थान आहे; छेडछाड ही निरागस असेल किंवा एका मर्यादेपर्यंत असेल तर खूप सुखद आठवणी देऊन जाते; हिंदी चित्रपटांनी एक मोठा गैरसमज निर्माण करून ठेवला आहे; 'प्यार की शुरुवात तकरार से सुरू होती है' त्यामुळे प्रेमात पडलेल्या प्रेमवीराने प्रेयसीची छेड काढलीच पाहिजे असा अलिखित नियम तयार झाला आहे.

शाळेमध्ये, कॉलेजमध्ये आपले मित्र फुकटच्या जोड्या लावण्याचे काम अगदी न चुकता करत असतात; 'बघ ती किंवा तो तुझ्याकडेच बघत आहे' असे सांगून अनेकांनी ब्रह्मदेवाचे 'लग्नाच्या गाठी बांधण्याचे काम' आपल्या हाती कधीना कधी घेतले असतेच. मित्र किंवा मैत्रीण सांगत आहे ते खरे आहे का हे तपासायला मग छेडछाड केली जाते; छेड काढल्यावर हसली म्हणजे फसली असा सोयीस्कर अर्थ काढून आपल्यापैकी अनेकांनी प्रेमप्रकरणाची सुरुवात केली असेल - काय बरोबर ना !

कधी कधी तर मित्र किंवा मैत्रिणीच्या लग्नामध्ये वधू व वर पक्षातील तरुण मुले मुली एकमेकांची छेड संगीताच्या माध्यमातून

काढत मेहंदीच्या कार्यक्रमात /संगीत कार्यक्रमामध्ये लज्जत आणण्याचा प्रयत्न करतात व त्या प्रयत्नामध्येच कधी तरी दोन हृदयांच्या तारा नकळतपणे जुळतात. सिलसिला मध्ये अमिताभ व रेखाचे प्रेम देखील 'लडकी है या शोला' या छेडछाड रुपी गाण्यामधूनच बहरास येते.

कधी कधी आपला गैरसमज होत असतो की एखादा मुलगा आपली छेड काढण्यासाठी आपल्या मागावर आहे पण प्रत्यक्षात वस्तुस्थिती काही औरच असते व ती कळल्यावर मात्र रागाचे /भीतीचे रूपांतर मैत्री किंवा प्रेमात होते; अगदी अशीच सिच्युएशन 'रिम झिम गीरे सावन ' या गाण्यामध्ये अमिताभ व मौसमी चॅटर्जी वर चित्रित झाली आहे.

होळीच्या निमित्ताने प्रेयसीच्या गालांना रंग लावण्याची छेड न काढणारा प्रियकर मिळणे तसे दुरापास्तच! ;या प्रसंगाचा 'डर ' चित्रपटामध्ये फार सुरेख उपयोग करून घेण्यात आला आहे; सहलीला जाताना फिशपॉन्ड च्या निमित्ताने आपल्या ग्रुपमधील लैला मजनूची छेड काढून त्यांना ऑकवर्ड करण्याची संधी काही खट्याळ मित्र मैत्रिणी शोधतच असतात.

चित्रपटामध्ये शम्मी कपूर ने खूप छेडछाड वाली गाणी केली आहेत; त्यातील काही म्हणजे,'लाल छडी मैदान खडी' किंवा 'दिवाने का नाम तो पूछो'

आमच्यावेळी आपण कोणाची छेडछाड करत आहोत ते गुपित ठेवण्यासाठी (आपल्या कोअर ग्रुप बाहेर पडू नये) त्या मुलाच्या किंवा मैत्रिणीच्या वडिलांच्या नावाने सर्व संभाषण केले जाई; समझनेवालोंको इशारा काफी होता है - काय भाऊ पटतंय ना!

पण या छेडछाड प्रकरणाचा एक दुःखद अनुभव मला आला आहे; आम्ही सर्व ट्रेनीज ऑफिस च्या इंडक्शन ट्रेनिंग साठी कलकत्ताच्या ‘बालीगंज’ ला गेलो होतो; आमच्या हॉस्टेल समोर एक सुंदर बंगाली मुलगी राहत असे; ती नेहमी गॅलरीमध्ये उभे राहून आमच्याकडे पाहत असे; विशेषतः माझ्याशी ती हसून संवाद साधण्याचा प्रयत्न करत असे; कारण मी रात्री टेपरेकॉर्डर वर लावत असलेली अभिमान, मिली, साथ साथ व अर्थची गाणी तिला आवडायची. आमच्या ग्रुपमध्ये एक राजस्थानी मुलगा होता; पारंपरिक राजस्थानी परंपरेतून आलेल्या त्याला, माझ्या काही मित्रांनी भरीस पाडून; ती वंगकन्या त्याच्यातच इंटरेस्टेड आहे असे पटविले; तो मुलगा देखील तिला रोज नवीन नवीन भेटी देऊ लागला; ट्रेनिंग चा काळ संपायला आला; मी त्या मित्राला मुलीच्या घरच्यांना तुझ्या प्रेमाची कल्पना दे असे सांगितले; आणि अघटित घडले त्या मुलीने सपशेल नकार दिला; आमचा मित्र डिप्रेशन मध्ये गेला व हिंसक झाला; शेवटी त्याच्या पालकांना बोलावून त्याला घेऊन जावे लागले.

आमच्या ग्रुपमध्ये एक शीख मित्र होता; तो दर रविवारी आपले केस पगडीतून सोडायचा व धुवायचा व मग कमरेपर्यंत लांब असलेले केस उन्हात सुकवत बसायचा; आमच्या ग्रुपमधील काहींनी आमच्या ऑफिसमधल्या एका बंगाली मुलाला होस्टेलवर आणले व गच्चीत केस सुकवित बसलेल्या त्या पाठमोऱ्या मित्राला मुलगी असे त्याला  भासविले; ती केस वाळवणारी मुलगी बंगाली असून प्रशांतला ती आवडली आहे तेव्हा तू दुभाष्या म्हणून त्याला मदत कर असे त्याला विनविण्यात आले; तर तो पठ्ठा महाराष्ट्रीयन मुलाला बंगाली कशाला हवी त्यापेक्षा मीच तिला प्रपोज करतो असे म्हणून गुढग्याला बाशिंग बांधून तयार झाला;  तेव्हा मग आम्हाला सत्य सांगावेच लागले.

माझ्या बंगाली मित्राच्या लग्नाला मी कलकत्त्याला गेलो होतो, तिथे लग्न झाल्यावर त्या रात्री मुलाची वरात परतते पण नवरा मुलगा व त्याचे दोन मित्र असे त्या रात्री सासरी राहतात. त्या रात्री मुलाच्या मित्रांचे काही खरे नसते.  माझे नाव प्रशांतो व माझ्या दोन्ही मुलांची नावे टिपिकल बंगाली असल्याने त्यांना मी बंगाली मुलीशी लग्न केले आहे असे वाटत होते; त्या रात्री मला त्या मुलींनी जे काही सतावले होते (फ्लर्टींग) ते माझ्यासाठी नवीनच होते; आणि अमरप्रेम मधील राजेश खन्ना सारखं बंगाली धोतर घातल्याने मी जरी आकर्षक दिसत होतो तरी मित्राच्या मेव्हण्यांना सामोरे जाणे खरोखरच तारेवरची कसरत होती.

नवरा बायको मध्ये पण छेडछाड़ होते का?; उत्तर निश्चितच हो आहे; कधी कधी लग्नानंतर नवऱ्याची मैत्रीण भेटली की बायकोला नवऱ्याची फिरकी घेण्याची इच्छा होते किंवा कधी कधी रुसलेल्या जोडीदाराला अजून चिडविण्यासाठी छेडछाड़ केली जाते; याचे उत्तम उदाहरण म्हणजे ' मैं का करूँ राम मुझे बुढ्ढा मिल गया' हे नटखट गाणे.

लग्न ठरलेल्या मुलां मुलींची देखील नातेवाईकांकडून थट्टा /छेड छाड़ केली जाते; विशेषतः होणाऱ्या सासरच्यांवरून; खूबसूरत मध्ये रेखाच्या तोंडचे गाणे, 'सुन सुन दीदी तेरे लिए एक रिश्ता आया है' हे त्याचे सुंदर उदाहरण आहे.

चला तर इमानदारीमध्ये आपले पण अनुभव शेअर करा

# पायरी

आयुष्यात आपल्याला पायरी प्रथम कळते ते 'अपयश ही यशाची पहिली पायरी असते' या सुभाषिताद्वारे; पुढे आयुष्यात क्वचितच 'पायरी सोडून वागू नकोस' असा दम देखील आपल्याला थोऱ्यामोठ्यांकडून मिळू लागतो; पण हळूहळू या पायऱ्या आपल्या भावविश्वाचा अविभाज्य भाग कशा बनतात हे आपल्याला देखील कळतच नाही.

चाळीतील पायऱ्यांवर बसून शिळोप्याच्या गप्पा रंगल्या नाहीत असे एकतरी बालपण मला कोणी तरी दाखवेल का?; गच्चीवर जाणाऱ्या पायऱ्यांवर बसून मित्रांसोबत चोरलेल्या कैऱ्या खाणे; एखादे चावट मासिक बघणे, सिगरेटचा झुरका घेणे हे उद्योग आपल्यापैकी अनेकांनी केलेले असतात. पायऱ्या या चोरून केलेल्या गाठी भेटी किंवा कट कारस्थानाच्या अशा सर्व भल्या बुऱ्या गोष्टींच्या साक्षीदार असतात; अगदी प्रेयसीला केलेल्या प्रपोझलच्या देखील!

कॉलेजच्या पायऱ्यांवर बसून केलेलं प्रेमाचे प्रपोझल जितके आठवणीत असते तेवढीच आठवणीत असते पावसामध्ये

पायरीवरून घसरून पडल्यामुळे मित्र मैत्रिणीं समोर झालेली फजिती!

या पायऱ्या जेव्हा एखाद्या देवळाच्या असतात तेव्हा मात्र मोठ्या भक्तीभावाने त्यावर माथा टेकला जातो; वैष्णोदेवीच्या पायऱ्या चढताना 'चलो बुलावा आया है' हे गाणे मला हटकून आठवायचे.

अशा या पायऱ्या अनेक नॉस्टॅल्जिक गाण्याच्या भाग कशा बनल्या हे आज आपण पाहणार आहोत. आज ही अनेक गावांमध्ये नदीकाठी असलेले मंदिर व मंदिराकडून नदीकिनारी उतरत जाणाऱ्या पायऱ्या दिसतात. गुंज उठी शहनाई मधील 'तेरे सूर और मेरे गीत' या गाण्यात अमिता व राजेंद्र कुमारचे प्रेम या पायऱ्यांच्या साक्षीनेच परवान चढताना रसिकांना पाहण्यास मिळाले. काही ठिकाणी नदीकाठी मंदिर नसते पण नदीवर पाणी भरायला जाण्यासाठी किंवा कपडे धुण्यासाठी पायऱ्यांची व्यवस्था असते; अशाच पायऱ्यांवरून हेमामालिनी व फरीदा जलाल जेव्हा 'बेचारा दिल क्या करे' असे गात गात मस्ती करत जात असतात तेव्हा चित्रपटाच्या नावाप्रमाणेच मैत्रीची खुशबू (सुगंध) आपल्याला अनुभवायला मिळते.

याच नदीकाठी जेव्हा एखादी तरुणी पाणी भरता भरता सुरेल गाणे गुणगुणत असते तेव्हा तिथून जाणारा वाटसरू ती सुरेल तान

ऐकून थबकला नाही तरच नवल! ‘अभिमान’ चित्रपटामध्ये जया बच्चन व अमिताभ यांच्यातील पहिल्या प्रेमाचा अंकुर फुलताना नदीकाठच्या या पायऱ्याच साक्षीदार झालेल्या पाहण्यास मिळाल्या; गाणे अर्थातच 'नदिया किनारे गिरा आई कंगना'

पण मला सर्वात भावलेले गाणे म्हणजे 'दिल का भंवर करे पुकार प्यार का राग सुनो'; कुतुब मिनारच्या पायऱ्यांच्या पार्श्वभूमीवर देव आनंद व नूतन मधील प्रणय पाहताना ज्या भावना मनात उठतात त्या शब्दांमध्ये व्यक्त करणे खरेच कठीण आहे. ‘प्यार की उंचाई, इष्क की गहराई’ किंवा ‘इस हसीं उतार पे हम न बैठे हार के’ या ओळींना न्याय देण्यासाठी पायऱ्यांचा केला गेलेला उपयोग केवळ लाजवाब. खरे तर २००३ साली कुतुब मिनार पाहायला गेलो होतो तेव्हा त्या पायऱ्यांवर थोडावेळ जाऊन विसावेसे वाटत होते पण आता कुतुबमिनारच्या आत जायला बंदी असल्याने त्या सुरेल पायऱ्यांना स्पर्श करण्याचे स्वप्न अपूर्णच राहिले.

मला आवडणाऱ्या दुसऱ्या गाण्यामध्ये देव आनंद-मधुबाला ही मदन-रतीची जोडी आहे; या गाण्याचे वैशिष्ट्य म्हणजे गाण्यात पायऱ्यांचे दर्शन एकदाही होत नसले तरी पायऱ्यांचा फील मात्र अचूक दिला गेला आहे; गाणे अर्थातच कालापानी मधील 'अच्छा जी मैं हारी, चलो मान जाओ ना'; या गाण्यामध्ये देव आनंद ने

पायरीचा अंदाज न आल्याने अडखळण्याचा अभिनय मस्त केला आहे तर मुक्री, आगा व जानकी दास यांनी पायऱ्यांवर उड्या मारत खालती उतरण्याचा अभिनय अगदी सुरावटी च्या तालावर केला आहे.

मी कधी काळी पवईच्या नीटी मधून पी एच डी करण्याचा विचार केला होता, नीटीच्या कॅम्पस मधील त्या पायऱ्या अनेकांच्या मनात घर करून राहण्याएवढ्या अनोख्या आहेत; मी जेव्हा अगदी फ्रेशर होतो व नोकरीच्या शोधात होतो तेव्हा अनेक जण मला सल्ला द्यायचे, 'अरे इंटरव्ह्यू ला जात आहेस, लिफ्ट नसेल व जिन्यावरून गेलास तर पायऱ्या मोजत जा कारण मुलाखत घेणारा एखादा चक्रम किती पायऱ्या चढून आला असा प्रश्न विचारू शकतो.'

जे बिग बीचे प्रचंड फॅन आहेत त्यांना ‘दिवार’ मधील मंदिराच्या पायऱ्यांवर बसून आईची वाट पाहणाऱ्या नास्तिक विजयची आठवण हटकून येणारच; तशीच काहीशी आठवण जम्पिंग जॅक चे चाहते असणाऱ्या लोकांना ‘हमजोली’ मधील जितेंद्र व लीना चंदावरकरची येणार, बॅडमिंटन खेळताना जितेंद्र व लीना स्टेडियमच्या पायऱ्यांवर देखील ठेका धरून जेव्हा 'ढल गया दिन हो गई शाम जाने दो जाना है ' म्हणून गातात तेव्हा बॅडमिंटन हे ऍक्रोबेटीक एक्ट होऊन जाते.

हिंदी चित्रपटांमध्ये रोमँटिक गाण्यांमध्ये स्वप्नसुंदरी थेट चंद्रावरून प्रियकराच्या कवेत येऊन विसावते हे दाखविण्यासाठी पायऱ्यांचा उपयोग केला जातो; याचे उत्तम उदाहरण म्हणजे 'प्यासा' मधील 'हम आप की आँखों में, इस दिल को बसा दें' हे गाणे.

माझे उंबरगाव चे घर एक मजली असल्याने साहजिकच माडीवर जाण्यासाठी जिना असायचा; त्या जिन्यावर बसून मी अनेकदा आजीला पूजापाठ करताना पाहिले आहे, तिची भजने ऐकली आहेत; घरातील स्त्रियांना चुरम्याचे लाडू करताना पाहिले आहे; ही सर्व दृश्ये आज देखील मनःपटलावर ताजी आहेत.

पायऱ्या म्हटले की आठवते नितांत सुंदर भजन; 'ना मैं धन चाहूँ, ना रतन चाहूँ तेरे चरणों की धूल मिल जाए, तो मैं तर जाऊँ शाम तर जाऊँ'; या मध्ये एक आई ईश्वराकडे सद्बुद्धी व देवाची फक्त कृपा मागत असते तर तिचा पदभ्रष्ट झालेला मुलगा (देवानंद) गैरमार्गाने कमावलेल्या पैशातून आणलेल्या भेटवस्तू घेऊन जिना चढत असतो व तिथेच तो आईचे बोल ऐकून अडखळतो; समृद्धीच्या पायऱ्या चढणारा तो खरं तर नीतिमत्तेच्या पायऱ्यांवरून घसरत असतो.

पायऱ्यांवर थबकून एखाद्याचे बोलणे चोरून ऐकणे किंवा कोणाच्या घराची बेल उगाच वाजवून वरच्या जिन्यावर जाऊन लपून बसणे असे उद्योग अनेकांनी केलेले असतात; या वरून मला

आठविणारी दोन गाणी म्हणजे ‘सफर’ चित्रपटामध्ये जिना चढता चढता शर्मिला ने गाणाऱ्या राजेशला चोरून ऐकणे व त्यात आपलीच स्तुती होत आहे हे ऐकून लाजेने चूर होणे; गाणे तुम्हाला आठवले असेलच; 'जीवन से भरी तेरी आँखें मजबूर करे जीने के लिए'

दुसरे गाणे 'चुपके चुपके' मधील 'अब के सजन सावनमें आग लगेली बदन में'; ज्यात आपल्या जिजाजींच्या (ओमप्रकाशच्या) नजरांना चकवून मेहुणी झालेली शर्मिला ड्रायव्हरच्या रूपात वावरणाऱ्या आपल्या पतीला (धर्मेंद्रला) भेटत असते, संशयी ओमप्रकाशाच्या नजरेपासून वाचण्यासाठी धर्मेंद्रने पायऱ्यांवर लपण्याच्या केलेला अभिनय या गाण्याला अजून संस्मरणीय बनविते.

थोडक्यात काय पत्नीला कडेवर घेऊन जेजुरीच्या गडाच्या पायऱ्या चढणे जितके रोमँटिक असते तेवढाच रोमान्स सिनेमातील पायऱ्यांवर आपल्याला विखुरलेला सापडेल; काय बरोबर बोलत आहे ना!

# ऑफिस रोमान्स

जुन्या काळात नसेल कदाचित; पण आजच्या या जमान्यात मात्र अनेकांच्या लग्नगाठी ऑफिस मध्येच जुळतात; ऑफिस रोमान्स हे देखील एक नॉस्टेल्जियाचे कारण असू शकते नाही का! ऑफिस रोमान्स म्हटले की अनेक सुंदर गाणी आठवतात; त्यातीलच एक म्हणजे जॉनी वॉकर वर चित्रित झालेले गाणे, 'जाने कहाँ मेरा जिगर गया जी'; या गाण्यामध्ये प्रियकर व प्रेयसी यांनी जी धमाल केली आहे ती केवळ लाजवाबच!

ऑफिस रोमान्स हा पांढरपेशा मध्यमवर्गाच्या लोकांच्या बाबतीमध्ये जरा जास्तच घडतो त्यामुळे मध्यमवर्गाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या अमोल पालेकरच्या चित्रपटामध्ये हा रोमान्स प्रकर्षाने जाणवायचा; अमोल पालेकर, असरानी व विद्या सिंहाच्या 'छोटीसी बात' या चित्रपटामधील रोमान्स हा जसा निरागस होता तसाच कुरघोडी /शह - काटशह यांनी देखील ओतप्रत भरला होता; यातील 'न जाने क्यों होता है ये ज़िन्दगी के साथ, अचानक ये मन; किसी के जाने के बाद, करे फिर उसकी याद' हे गाणे अनेकांच्या मनामध्ये नॉस्टॅलजियाचे फिलिंग निर्माण करते. प्रेमात पडलेली

व्यक्ती कधी कधी ऑफिसच्या रुक्ष गराड्यात देखील प्रेयसी किंवा प्रियकराच्या आठवणींमध्ये कशी पार हरवून जाते हे विद्या सिन्हाच्या सहज अभिनयातून अनुभवताना एक वेगळीच मजा येते.

ऑफिस रोमान्स मुळे जशी अनेक लग्नाळू तरुण तरुणींची नाळ जुळते तद्वत कित्येकांच्या वैवाहिक जीवनामध्ये वादळ देखील निर्माण करते; पती पत्नी और वो या चित्रपटामध्ये सेक्रेटरीला पटवू पाहणाऱ्या बॉस चे पात्र संजीव कुमार यांनी भन्नाट रंगवले होते; तर 'येस बॉस' या चित्रपटामध्ये लंपट बॉस पासून सुंदर सेक्रेटरीला वाचविणाऱ्या भूमिकेत शाहरुख खान खूप भाव खाऊन गेला होता.

याउलट घरोंदा मधील कथानक होते; घरोंदा चित्रपटामधील ऑफिस रोमान्स ला कारुण्याची झालर आहे; एकाच ऑफिस मध्ये काम करणाऱ्या अमोल पालेकर व झरीना वहाब चे एकमेकांवर जीवापाड प्रेम असते; दोघे सुखाचा संसार थाटण्यासाठी घरकुलाचे स्वप्न पाहतात; पण ते स्वप्नच उध्वस्त झाल्याने अमोल पालेकर झरीनाला एक इंडिसेन्ट प्रपोझल देतो; अमोल हृदयविकाराने त्रस्त झालेल्या आपल्या बॉस सोबतच आपल्या प्रेयसीला लग्न करण्याची गळ घालतो; उद्देश हा की बॉस काही महिन्यामध्येच मरेल व आपली प्रेयसी व बॉस ची संपत्ती दोन्ही आपल्याला मिळतील. या चित्रपटामधील 'दो दिवाने शहरमें' हे गाणे म्हणजे

ऑफिस संपल्यानंतर बांद्रा बँड स्टॅन्ड ला प्रेमाराधन करायला जाणाऱ्या प्रेमिकांचे प्रातिनिधिक उदाहरणच आहे.

हॉस्पिटलच्या पार्श्वभूमीवर डॉक्टर व नर्स मधील प्रेमाचे सुंदर चित्रीकरण 'दिल अपना और प्रीत पराई' या चित्रपटामध्ये आहे; त्यातील 'अंदाज मेरा मस्ताना' हे गाणे जसे मनाला भुरळ पाडते तसेच प्रेमभंग झाल्याने (प्रियकराचे दुसऱ्या कोणाशीच लग्न झाल्यामुळे) मीना कुमारीच्या तोंडचे 'अजीब दास्ताँ है' हे गाणे देखील भंगलेल्या हृदयाचे प्रतिनिधित्व करत असल्याने हृदयाच्या हळव्या कोपऱ्यात नकळतच विराजमान होते. ह्या गाण्यांमुळेच 'मोगल ए आझम' सारख्या अभिजात संगीत असलेल्या चित्रपटाला त्या वर्षीचे फिल्म फेअर मिळू शकले नाही व या गोष्टीमुळे नौशादजी खट्टू झाले होते; 'अजीब दास्ताँ है' या गाण्याची भुरळ जगभरच्या संगीत प्रेमिकांना एवढी पडली होती की या वरूनच 'आयलंड सॉन्ग' या गाण्याची पुढे जाऊन निर्मिती झाली होती.

त्रिशूल चित्रपटामध्ये देखील ऑफिस रोमान्स पाहायला मिळाला; संजीव कुमारच्या मर्जीतील सेक्रेटरी असलेल्या राखीला अमिताभ आपल्या ऑफिस मध्ये काम करण्याची ऑफर देतो; आपल्या बापाला बिझनेसमध्ये (व वैयक्तिक आयुष्यात देखील) बरबाद करून आपल्या मृत आईच्या आत्म्याला शांती मिळवून

देणाऱ्या अँग्री यंग मुलाच्या आयुष्यात राखीच्या रूपामध्ये प्रेमाची हिरवळ येते; ह्या सुखाच्या हिरवळीत विसावलो तर आपला मूळ उद्देश बाजूला पडेल म्हणून अमिताभ प्रेमाचे अस्तित्वच नाकारतो तेव्हा त्याला प्रेमाची ताकद दाखवून देण्यासाठी एक सुंदर गीत रसिकांपुढे येते; बोल अर्थातच '[मोहब्बत बडे काम की चीज है']

ऑफिस रोमान्सच्या काही दुःखद स्मृती माझ्या पाहण्यात आल्या आहेत, मुलगा व मुलगी एकाच टेक्स्टाईल मिल मध्ये कामाला होते; गिरण्यांचा ऐतिहासिक संप झाला व या दोघांच्या नोकऱ्या एकदम गेल्या; या तडाख्यातून हे कुटुंब पुढे कधीच खऱ्या अर्थाने सावरले नाही कारण बरेचदा ऑफिस रोमान्समुळे निवडलेल्या जोडीला घरच्यांकडून मान्यता न मिळण्याचे ते दिवस होते; ऑफिस रोमान्स म्हणजे नो कुंडली मॅचिंग, नो हुंडा त्यामुळे ऑफिस रोमान्स आमच्यावेळी मोठीच रिस्क असायची.

मी एच आर डिपार्टमेंट मध्ये काम करत असल्याने ऑफिस रोमान्स आमच्यासाठी थोडा अनरोमँटिक विषय व्हायचा; साहजिकच आहे खूप कंपन्यांमध्ये नवरा व बायकोला एकत्र काम करण्यास बंदी असते किंवा नवरा व बायको एकाच कंपनीमध्ये असल्यास दोघांपैकी एकालाच 'एल टी ए' मागण्याचा अधिकार असेल असा नियम असतो; ऑफिस मधील प्रेमाचे रूपांतर लग्नात

झाल्यावर एच आर डिपार्टमेंटचे असे खलनायक होणे मला व्यक्तिशः आवडत नाही.

आजकाल ऑफिस रोमान्स ला 'लव्ह कम अरेंज्ड' चे कोंदण लाभत आहे; मुलगा मुलगी एकमेकांना पसंत करतात व मग घराच्या लोकांची संमती मिळवितात; पण या सर्वांमध्ये आमच्या सारख्या एच आर च्या लोकांची पंचाईत होते; 'मुलाचे किंवा मुलीचे आधी कोणासोबत लफडे होते का?, मुलगा सिगारेट ओढतो का?, ऑफिस पार्टीज मध्ये दारू पितो का?, ऑफिस मध्ये प्रमोशनची संधी कितपत आहे?' अशा पद्धतीचे प्रश्न विचारून एच आर ला भंडावून सोडले जाते. वरील सर्व जरी खरे असले तरी ऑफिस रोमान्स मुळे पूर्ण ऑफिसमध्येच एक प्रकारची हलचल निर्माण होते कारण प्रेम करणारे त्यांच्याच विश्वात जरी रमलेले असतात तर तरी बाकीचे मात्र गॉसिपिंग करण्यात व्यस्त!

ऑफिस रोमान्स म्हटले की ‘अशी ही बनवाबनवी’ चित्रपटामधील अशोक सराफ; अश्विनी भावे व लिंबू कलरची साडी कोण बरे विसरेल?; मराठी चित्रपटामध्ये मात्र ऑफिस रोमान्स वरील गाणे मिळणे जरा दुरापास्तच आहे; जर रसिकांना एखादे गाणे आठवत असेल तर नक्की कळवावे.

# रात्र

रात्र म्हटले की अनेकांना सुखद, दुःखद, मजेशीर किंवा भयप्रद प्रसंग सहज आठवतात; रात्र म्हटले की वयोगटानुसार त्या आठवणी बदलत जातात.

लहानपणी मुलांना लवकर झोपण्यासाठी दोन प्रकारे प्रेरित केले जायचे एक प्रकार खूप हळवा व मायेने ओतप्रत भरलेला असायचा व तो म्हणजे आईने गायलेली अंगाई किंवा आजीने मोठ्या मायेने कुशीत घेऊन सांगितलेल्या गोष्टी; तर दुसरा प्रकार म्हणजे बागुलबुवाची दहशत; शोले मध्ये गब्बरची दहशत अधोरेखित करण्यासाठी या दुसऱ्या प्रकारचा उल्लेख हटकून करण्यात आला आहे; रात्र व अंगाई म्हटले की आठवते; 'लिंबोणीच्या झाडामागे चंद्र झोपला ग बाई' हे सर्वांग सुंदर गाणे.

पण जेव्हा आई ही साक्षात जिजामाता असते व पुत्र शिवाजी राजे असतात तेव्हा त्याच अंगाई गीतामध्ये बागुलबुवा च्या नावाखाली स्वराज्याच्या शत्रूबद्दल माहिती देऊन एक वीरमाता आपल्या मुलाचे समाजप्रबोधन देखील करते; गाणे अर्थातच 'गुणी बाळ असा जागसि का रे बाळा' आणि जेव्हा अशी अंगाई जन्माला

येते तेव्हा काळरात्र सरून उषःकाल येणार याची खात्रीच पटू लागते.

माझ्या मावसभावाची आजी मालवणी बोलायची; मी जेव्हा मावसभावाकडे राहायला जायचो तेव्हा आजी आम्हा नातवंडांना मालवणी भाषेमधून रामायण किंवा महाभारतामधील गोष्टी सांगायची; अर्जुन म्हणालो, 'रे भीमा, मला इसरलोस ना; कुंती आउशीने केलेली खीर तू कित्याक खाल्ली' असे गोड संभाषण ऐकताना निद्रेच्या अधीन कधी व्हायचो ते कळायचेच नाही.

रात्र म्हटली की आठवतात येशुदास चे हळवे सूर, मतिमंद श्रीदेवीला बापाच्या मायेने झोपविणारा कमला हसन जेव्हा 'सुरमई अखियोंमे एक नन्हामुन्ना सपना दे जारे' गातो तेव्हा ती रात्र करुण भासते पण त्यासोबत निर्व्याज प्रेमाची साक्षीदार देखील होते. 'रात के रथ पर जाने वाले,नींद का रस बरसाने वाले' चंद्राचे किती सार्थक वर्णन आहे यात; खरंच रात्रीला चंद्राशिवाय शोभाच नाही.

रात्र म्हटले की नुकत्याच लग्न झालेल्या मुलींना मोहरून टाकते ती मधुचंद्राची रात्र; पण मधुचंद्र म्हटले की मला मात्र आठवते ते मजेशीर गाणे जे डॉ काशिनाथ घाणेकर व उमा वर चित्रीत झालेले आहे; बोल अर्थातच 'मधू इथे अन चंद्र तिथे, झुरतो अंधारात... अजब ही मधुचंद्राची रात्र ' हे गाणे; अनेकदा मधुचंद्राच्या रात्री नवीन जोडप्याची रात्र ठिकठिकाणी लपविलेली

गजराची घड्याळे; गादीखाली लपविलेले पापड शोधण्यात जाते किंवा दारावरच्या नकोशा टकटक ऐकण्यात जातो पण याच खट्याळपणामुळे मधुचंद्राची रात्र आठवणीत राहते.

रात्र म्हटली की महिलांना आठवतात मंगळागौरीची जागरणे, चांदण्या रात्री केलेले डोहाळे जेवण किंवा कोजागिरीच्या रात्रीमध्ये केलेले दुग्धपान; ‘उंबरठा’ चित्रपटामधील 'चांद मातला' हे गाणे रात्रीच्या जागरणाला कस्तुरीचा गंध देऊन जाते.

रात्र म्हटली की गावाच्या तरुण वर्गाला भुरळ घालते रात्रभर रंगणाऱ्या लावणीच्या फडाची; 'तुम्हावर केली मी मर्जी बहाल' या गाण्यामधील 'अशीच ऱ्हावी रात साजणा, कधी न व्हावी सकाळ' या ओळी रात्रीच्या आठवणींना खुमासदार करून जातात.

कधी कधी जीवनात येणारी एखादी रात्र उद्याचे अनिश्चित भविष्य किंवा ताटातूट घेऊन येणार असते अशावेळी ती हुरहूर लावणारी रात्र खूप जीवघेणी वाटते किंवा कधीच संपू नये असे वाटत असते. ‘रुक जा रात ठहर जा रे चँदा, बीते ना मिलन की बेला आज चाँदनी की नगरी में अरमानों का मेला पहले मिलन की यादें लेकर आई है ये रात सुहानी’ या ओळी जशा काळजाला भोकं पाडून जातात तसेच दुसरे एक गाणे काळजाचे पाणी पाणी करून जाते व ते आहे, 'रुके रुके से कदम (चित्रपट - मौसम)’

असे म्हणतात की 'दिवस हा शहाणा असतो तर रात्र वेडी असते' रात्रीची वेळ ही मोहात पाडणारी असते, संयम सुटेल असे वागण्यास प्रवृत्त करणारी असते; याचेच वर्णन करणारे ज्वेल थीफ मधील गाणे; 'रात अकेली है, बुझ गये दिये.' गुलजार 'इजाजत' चित्रपटामध्ये काय मस्त लिहून गेले आहेत,’ मेरा कुछ सामान तुम्हारे पास पड़ा है’; यामध्ये त्या वेड्या रात्रींचे किती समर्पक वर्णन आहे; 'मेरे इक ख़त मैं लिपटी रात पड़ी है, वो रात भुला दो, मेरा वो सामान लौटा दो' किंवा 'एक सो सोला चाँद की रातें'; गुलजार साहेबांना खरंच कुर्निसात करावासा वाटतो.

रात्र म्हटली की आठवतात भुतंखेतं, कट कारस्थान, एक गूढता; नर्गिस ने 'रात और दिन' या चित्रपटामध्ये स्प्लिट पर्सनॅलिटी साकारली होती; 'दिल की गिरह खोल दो' या गाण्यामध्ये सकाळी सुसंकृत असलेली भारतीय नारी वंदना, रात्री मात्र पेगी होऊन अनोळखी माणसासोबत क्लब मध्ये पाश्चात्य पोषाखामध्ये नाचते, रात्रीचा संबंध हा असा स्प्लिट पर्सनॅलिटीशी सुंदर रित्या जोडला आहे.

कोहरा मधील रात्रीच्या वेळी गुढरित्या वावरणारी वहिदा व हेमंत कुमार यांच्या गूढ धीर गंभीर आवाजातील ' ये नयन डरे डरे, ये जाम भरे भरे; ज़रा पीने दो; कल की किसको खबर, इक रात होके निडर मुझे जीने दो' हे गाणे म्हणजे शब्दांपलीकडची अनुभूती आहे.

रात्र म्हटले की मराठीमधील गूढत्वाचे कोंदण लाभलेले रोमँटिक गाणे 'रात्रीस खेळ चाले हा गूढ चांदण्याचा' हे गाणे न आठविणारा संगीतप्रेमी विरळाच!

‘इस रातकी सुबह नहीं’ असे काहीसे रात्रीवरील गाणी निवडताना माझी झाली होती त्यामुळे या विषयावर पुढे देखील मी लिहीनच ज्यात या लेखामध्ये निसटून गेलेली रात्रीवरची गाणी मी परत एकदा घेऊन येईन.

पाण्याच्या एका घोटासाठी रात्रभर वणवण भटकणारा 'जागते रहो' मधील राजकपूर व त्याची तहान भल्या पहाटे तृप्त करणारी नर्गिस त्या अतृप्त रात्रीला परिपूर्ण करते; अशीच परिपूर्णता हा लेख रसिकांना प्राप्त करून देवो.

# नृत्य

माणूस हा उत्सवप्रिय प्राणी असल्याने त्याला संगीत व नृत्य हे दोन्ही प्रकार प्रिय असतात पण आपण तोंड उघडले किंवा पाय थिरकविले तर जगापुढे हसे होईल या भीतीने तो व्यक्त होण्यास घाबरतो; पण आयुष्यात असे काही क्षण असतात की आपण सहजपणे नृत्य करण्यास प्रवृत्त होतो. मित्राचे किंवा मैत्रिणीचे मेहंदी संगीत असो किंवा त्यांची वरात असो; आपल्याला नाचण्यासाठी भाग पाडले जातेच. तसेच कधी कधी गणपती विसर्जन मिरवणुकीमध्ये बाप्पाचं आपल्याला नृत्य करण्यास प्रवृत्त करतो; कॉलेज लाईफ मधील शेवटचा दिवस देखील नृत्याशिवाय अपूर्णच असतो.

प्रत्येक प्रसंगाला साजेसे असेच नृत्य हवे; जसे कोकणामधील गणेशोत्सव म्हटले की बाला डान्स हवाच; माझ्या मावशीचे यजमान सुंदर बाला डान्स करतात. दहीहंडी म्हटले की देखील तरुणाईचे पाय थिरकतातच; 'ब्लफ मास्टर' मधील शम्मीकपूर चे गाणे; 'गोविंदा आला रे आला जरा मटकी संभाल बृजबाला' दही हंडीच्या या उत्सवाला चार चाँद लावतात.

नृत्य म्हटले की प्रत्येक नायकाची एक विशिष्ट स्टाईल असते; पण या नायकांचा कोणी दादा असलाच तर ते आपले मराठमोळे भगवान दादाच; 'अलबेला' मधील 'भोली सुरत दिल के खोटे' हे गाणे म्हणजे नॉस्टॅलजिया चा परमोच्च बिंदूच आहे. भगवान दादांची अनोखी स्टाईल वापरण्याचा मोह अगदी अमिताभला देखील आवरता आला नाही; 'पप्पू कान्ट डान्स साला' ऐकून नाचणाऱ्या आजच्या तरुणांना देखील भगवान दादांची कंबर हलविण्याची अदा घायाळ करून टाकते; रेट्रो थीम मध्ये हे गाणे नेहमीच टॉप वर असते.

आमच्या मित्रांची अलिबागला मस्त पार्टी रंगली होती; सगळे अगदी एक दोन पेग घेऊन मदहोश झाले होते अशावेळी नाचताना काही गाणी वाजविणे क्रमप्राप्तच असते; त्यातीलच एक म्हणजे 'दो घूँट मुझे भी पिला दे शराबी'; याच गाण्यावर मी थम्स अप ची बाटली डोक्यावर घेऊन माझ्या मित्रांसोबत नाचलो होतो; हा कोडॅक मोमेन्ट त्यानंतर काही वर्षांनी माझ्या होणाऱ्या सासू सासऱ्यांनी अल्बम मध्ये पाहिला होता व ते देखील जेव्हा सर्वप्रथम ते लग्नापूर्वी माझे घर पाहण्यास आले होते तेव्हा; पण हेच गाणे जेव्हा गणेश विसर्जन मिरवणुकीमध्ये वाजविले जाते तेव्हा मात्र मनाला यातना होतात.

वेलिंगकर कॉलेज मधून तीन वर्षांचा मॅनेजमेंट कोर्स करून जेव्हा कॉलेज ला राम राम म्हणण्याची वेळ आली तेव्हा देखील आम्ही सर्वांनी तो विरहाचा क्षण 'जिंदगी मिलेगी ना दोबारा' च्या धर्तीवर मनसोक्त नाचून साजरा केला होता.   मला नाचताना कॅमेऱ्यामध्ये आज पर्यंत फक्त तीनदाच कैद केले गेले आहे; हा तिसरा क्षण होता; पहिला क्षण अर्थातच शाळेच्या वार्षिकोत्सवामध्ये चौथी मध्ये असताना शेतकरी नृत्याच्या वेळचा होता.

काही म्हणा भारतीय लोकनृत्यांमधून दिसणारी नजाकत जगामध्ये इतर क्वचितच दिसून येते त्यामुळे बॉलिवूड मधील मला आवडणारी नृत्ये हे बहुतेक करून लोकनृत्येच आहेत. मधुमती चित्रपटामधील 'चढ़ गयो पापी बिछुआ' गाण्यामध्ये वैजयंतीमाला सुरेख नाचली आहे यात काही दुमत किंवा आश्चर्य नाहीच पण या गाण्यामध्ये एक माणूस एक वैशिष्ट्यपूर्ण लोकवाद्य घेऊन ज्या प्रकारे लयबद्ध नाचतो त्यामुळे सलील चौधरी यांच्या आसामी लोक संगीताला /व इंटरल्यूडला (दोन कडव्यांमधील संगीताच्या तुकड्याला) अजून प्रेक्षणीय केले आहे .

मला राजस्थान व पश्चिम बंगाल या दोन राज्यांच्या संस्कृतीबद्दल खूप अप्रूप वाटते, मी माझ्या सौ ला हनिमून साठी राजस्थानला फिरायला घेऊन गेलो होतो; एक दिवस आम्ही

पाकिस्तानी बॉर्डर वरच्या राजस्थानी खेड्यामध्ये काही तास घालविले; तिथे राजस्थानी संस्कृतीचे प्रदर्शन होते ज्यात कठपुतळीचा डान्स देखील होतो, कठपुतळी म्हटली की दोन नृत्ये माझ्या डोळ्यासमोर नेहमी फेर धरू लागतात; पहिले 'चोरी चोरी' चित्रपटामधील 'जहाँ मैं जाती हूँ वहीं चले आते हो चोरी चोरी मेरे दिल में समाते हो ये तो बताओ कि तुम मेरे कौन हो' आणि ‘बोल रे कठपुतलीडोरी’

नृत्यामध्ये उच्च दर्जाची एनर्जी शेवटपर्यंत कशी टिकवून ठेवायची याचे उत्तम प्रात्यक्षिक आपल्याला 'पवन दिवानी न माने' या गीतामध्ये वैजयंतीमाला या अभिनेत्रीने दाखविले आहे तर पाश्चिमात्य कॅब्रे ला अश्लील ते कडे न झुकविता प्रेक्षणीय बनविण्याचा मक्ता हेलन या गुणी अभिनेत्री / नर्तिकेने घेतला होता. हावडा ब्रिज मधील 'मेरा नाम चीन चीन चू ' या गाण्यामध्ये हेलन काय गोड दिसली आहे; हेलन इतकीच गोड ‘समाधी’ चित्रपटामध्ये नलिनी जयवंत दिसली आहे; गाणे अर्थातच 'गोरे गोरे ओ बांके छोरे'

'अपलम चपलम' हे एकमेव नृत्य असेल ज्यात दोन बहिणींनी नृत्याविष्कार दाखविला आहे तर दोन सख्ख्या बहिणींनी पार्श्वगायन केले आहे (लता व उषा मंगेशकर); त्यामुळे नृत्याचा विषय निघाला

की हे गाणे ओठावर येतेच. हुबेहूब सारख्या भावमुद्रा पेश करणाऱ्या (सिन्क्रोनस डान्सर) म्हणून साई व सुब्बुलक्ष्मी प्रसिद्ध होत्या.

लता दीदींच्या पुस्तकासाठी मला वैजयंतीमाला यांची मुलाखत घेण्याचा योग आला होता त्यावेळी त्यांनी मला त्यांचा नृत्याविष्कार पाहण्यासाठी चेन्नईला येण्याचे अगत्याचे आमंत्रण दिले होते पण माझ्या कामाच्या व्यापामुळे तो अमृतयोग चुकला याचे आज देखील मला वैषम्य वाटते.

वनवासी कल्याण आश्रमातर्फे मी दोनदा तलासरी आंबेसरी इथे आदिवासींसोबत रामनवमी व हनुमान जयंती साजरी करण्यासाठी गेलो होतो; आदिवासींसोबत वनामध्ये भोजन केल्यावर आमच्या बऱ्याच गप्पा रंगायच्या, मुंबईला निघण्यापूर्वी चहा घेताना दोन्ही वेळा आदिवासी तरुण मुलांमुलींसोबत नृत्याचा कार्यक्रम रंगला. आदिवासी बोलीमधील गाण्यावर त्या मुलांसोबत नाचणे हे आमच्या ग्रुप मधील वयस्कर बायकांना खूप आवडायचे कारण त्यामुळे त्यांना आपले वय विसरायचे निमित्त तर मिळायचेच व सोबत नृत्याच्या हटके स्टेप्स पण अनुभवायला मिळायच्या; हे दृश्य खूपच मनमोहक असायचे; त्यावेळी डोळ्यांसमोर आदिवासींसोबत नृत्य करणाऱ्या इंदिरा गांधी माझ्या डोळ्यासमोर यायच्या आणि आठवायचे दिलीप कुमारचे ‘गंगा जमना’ मधील गाणे 'नैन लड़ जैंहे तो मनवा में कसक होइबे करी'. या गाण्यामध्ये

दिलीपकुमार सहकलाकारांसोबत हातात हात धरून दोन्ही पाय एकमेकांवर क्रॉस करत तीन स्टेप्स घेतो; या गाण्याचा तो हटके डान्स पीस आहे; या गाण्यामध्ये च नव्हे तर संपूर्ण चित्रपटामध्ये अवधी भाषेचा जो वापर केला गेला आहे त्यामुळे हे गाणे व नृत्य भारतीय मातीचा सुगंध मागे ठेवून जाते.

उंबरगाव माझे आजोळ; जिथे नवरात्रीमध्ये अस्सल गरबा रंगायचा; आज काल सारखा कर्णकर्कश्य दांडिया नाही; गरबा म्हणजे फक्त हाताच्या विविध मुद्रा केलेला मोहक नृत्याविष्कार; गुजराथी माणसाचा मानबिंदू म्हणजे गरबा, मराठी माणसाचा लावणी तर दाक्षिणात्य लोकांचा मानबिंदू भरतनाट्यम; उत्तरेकडील पंजाबी लोकांचा भांगडा कोणी बरे कसे विसरू शकेल?

'मैं तो भूल चली बाबुल का देस पिया का घर प्यारा लगे' या गाण्यामध्ये देखील आपल्या भारतीय परंपरेची कस्तुरी दरवळते.

पण मला भावलेलं सर्वात भारी नृत्य आहे ते चित्रपटामधील नाही तर रणभूमीवरील; उध्वस्त पाकिस्तानी रणगाड्यावर आपल्या विजयी शूर भारतीय सैनिकांनी केलेला भांगडा!; ज्याचे वर्णन 'बॉर्डर' चित्रपटामध्ये डोळ्यासमोर आणले गेले आहे.

# आंधळा मागतो एक डोळा

तुम्हा सर्वांना ही म्हण माहीतच असेल; 'आंधळा मागतो एक डोळा अन देव देतो दोन.' असा अनुभव आपल्याला जीवनात देखील कधी ना कधी आला असेलच; नाही का?; म्हणजे बघा ना दूरच्या प्रवासाचे तिकीट वेटिंग लिस्ट वर असल्याने प्रवास करता येईल का ही धाकधूक असताना चक्क तिकीट कन्फर्म होऊन विंडो सीट मिळणे किंवा अगदी स्वप्नात देखील नसताना विमानात आपल्या शेजारी एखादी सेलिब्रेटी येऊन बसणे या सारखा सुखद धक्का दुसरा नसतो; मला देखील कलकत्त्यावरून मुंबईला येताना असाच एक अनुभव आला होता; विमानात माझ्या पुढील सीट वर चक्क पार्श्वगायिका अनुराधा पौडवाल बसल्या होत्या; साहजिकच त्यांची स्वाक्षरी घेता आली व थोडे फार बोलता देखील आले.

आता हेच बघा ना कानसेनांमध्ये उघड उघड दोन गट आहेत; एक लता दीदींच्या आवाजाचा फॅन असलेला तर दुसरा आशा भोसले यांच्या आवाजासाठी वेडा असलेला; आता कल्पना करा या दोघी जर एकत्र गायल्या तर कानसेनांसाठी 'आंधळा मागतो एक डोळा' याच धर्तीवर प्रसंग ओढविणार ना!; असा सुखद धक्का या दोघी बहिणींनी अनेकदा आपल्याला दिला आहे व आज आपण अशाच काही गाण्यांची चर्चा करणार आहोत. मला सर्वप्रथम

आठविणारे गाणे आहे 'जहाँ आरा' मधील 'जब जब तुम्हे भुलाया तुम और याद आए' मदन मोहन व या दोन्ही बहिणी म्हणजे जणू त्रिवेणी संगमच!

'मन क्यों बेहका रे बेहका आधी रात को, बेला मेहका रे मेहका आधी रात को' या गाण्याबद्दल मला व्यक्तिशः खूप ममत्व आहे कारण या गाण्याचे गीतकार माझ्या पार्ले कॉलेज चे प्रोफेसर वसंत देव आहेत व या गाण्यामध्ये देखील आशा व लता या दोघींची जुगलबंदी मस्त रंगली आहे, पडदयावर रेखा व अनुराधा पटेल असल्यावर तर काय सोने पे सुहागाच!

आशा ताई यांना एकदा विचारले गेले की 'आपला सर्वात आवडता सह पार्श्वगायक कोण' तेव्हा समीक्षकांना रफी किंवा किशोर हे उत्तर अपेक्षित होते पण आशा ताईचे उत्तर होते, 'लता दीदी' कारण लतादीदींसोबत माईक शेअर करणे हे जितके आल्हाददायक असते तेवढेच आव्हानात्मक देखील.

माझ्या सारख्या आंधळ्याला देवाने अनेकदा दोन डोळे दिले आहेत; उदाहरण द्यायचे झाल्यास एकाच पानावर पाच ही मंगेशकरांच्या स्वाक्षरी घेता येणे असो की क्रिकेटच्या देवाची, सचिन तेंडुलकरची मुलाखत त्याच्याच दिवाणखान्यात बसून घेता येणे असो.

नौशाद यांनी देखील आशा व लता यांचा एकत्र उपयोग करून घेतला आहे, चित्रपट अर्थातच 'मेरे मेहबूब' व गाणे 'मेरे मेहबूब में क्या नहीं' इथे देखील पडद्यावर रुपगर्विता साधना असल्याने गाण्याची लज्जत हजार पटींनी वाढली आहे.

'ओ चांद जहाँ वो जाये ' शारदा चित्रपटातील या गाण्यात देखील आशा व लता या जोडीने जो गोडवा पेरला आहे त्याला तोड नाही; मीनाकुमारी व श्यामा या दोघींच्या चेहऱ्यावरील निरागस भाव या गाण्याला अजून निखार आणतात.

‘बसंत बहार’ चित्रपटामधील 'कर गया रे, कर गया मुझपे जादू' ह्या गाण्यात देखील गंगा जमुनासारखा स्वरांचा संगम ऐकायला मिळतो; भारत भूषण चा निर्विकार चेहरा सुसह्य झाला तो या दोन बहिणींच्या सुरांमुळेच. प्रोफेसर चित्रपटामधील 'हमरे गाँव कोई आयेगा' हे गाणे देखील या दोघी बहिणींच्या प्रतिभेचे उत्तम उदाहरण आहे; 'क्या हुआ ये मुझे क्या हुआ' हे गाणे 'जिस देस में गंगा बहती है' या चित्रपटामध्ये आहे ज्यात शंकर जयकिशन यांनी परत एकदा आशा लता या जोडीला रसिकांपुढे पेश केले होते.

'काहे तरसाए, जियरा; काहे तरसाये' हे चित्रलेखा चित्रपटामधील गाणे देखील दोन्ही बहिणींनीच गायले आहे पण आशा भोसले यांच्या सोबत लता दीदी नाही तर उषा मंगेशकर

आहेत; काही कानसेनांच्या माहितीसाठी हे इथे मुद्दामहून नमूद करत आहे.

‘हलाकू’ या चित्रपटामध्ये आशा व लता दीदी यांचे एक दिलखेचक गाणे आहे, 'अजि चले आओ'; या गाण्यामध्ये आपल्याला प्राण व अजित सारखे खलनायक हेलनच्या अदा अनुभवताना दिसतात. या वरून आठवण येते ती भारत रत्न अटलबिहारी वाजपेयी यांची. लता व अटल ही नाव इंग्रजी मध्ये लिहिली तर एक मजा दिसून येते, 'LATA' उलटे लिहिल्यास 'ATAL' होते; अटलजींना जसा दीदींचा आवाज पसंत होता तेवढाच पसंत अजित चा अभिनय देखील; अजित चा एक देखील चित्रपट अटलजी यांनी चुकविला नव्हता.


अटलजी व त्यांचा मित्र दोघेही अजित यांचे चाहते होते एकदा या दोघांमध्ये पैज लागली की अजित हे कोणत्या प्रांतांमधून येतात; अटलजी यांचे म्हणणे होते अजित यु पी मधील शाहजहाँपूर चे होते तर मित्राच्या मते अजित हैदराबादचे होते; दोघे जण पैज कोणी जिंकली हे बघण्यासाठी मध्यरात्री आपल्या पत्रकार मित्राकडे गेले; पत्रकार मित्र अटलजींच्या पागलपन ला काय म्हणावे असे विचार करत असताना अचानक हसू लागले कारण अटलजी जिंकले देखील होते व हरले देखील होते कारण अजित यांचे घराणे जरी शाहजहाँपूर चे होते तरी अजित यांचा जन्म मात्र हैदराबादचा होता;


अजित यांची कबर म्हणूनच रसिकांना शाहजहाँपूर येथे पाहायला मिळते.

हेमंत कुमार यांनी लता आशा या जोडीला ‘मिस मेरी’ या चित्रपटामध्ये एक शास्त्रीय जुगलबंदी दिली आहे, 'सखी रे सून बोले पपीहा उस पार.'

अदालत चित्रपटामध्ये मदन मोहन यांनी 'जा जा रे साजना' या एकाच गाण्यामध्ये लता चा उदासवाणा खिन्न आवाज तर आशाचा अल्ल्ड अवखळ आवाज वापरून एक अजरामर कॉम्बिनेशन दिले आहे; मदन मोहन हे माझे आवडते संगीतकार आहेत कारण ते प्रयोगशील देखील होते त्यांनी ‘देख कबिरा रोया या चित्रपटामध्ये लता च्या दोन गाण्यांमध्ये आशा ने गायलेले गाणे सॅन्डविच करून ड्युएटची जादू साधली आहे; गाणी अर्थातच 'मेरी वीणा तुम बिन रोए' (लता) - अश्कोसे 'तेरी हमने तस्वीर (आशा) - तू प्यार करे या ठुकराये (लता)

शेवटी या आंधळ्याचे देवाकडे अजून एक मागणे आहे; जसे लता दीदींवर पुस्तक लिहिण्याचे भाग्य मला मिळाले तसेच भाग्य आशा भोसले यांच्यावर पुस्तक लिहिण्याचे देखील मला मिळून दे म्हणजे आंधळा मागतो एक आणि देव देतो दोन म्हणायला परत मी मोकळा!










प्रशांत दांडेकर यांची

ई साहित्यवरची 6 पुस्तके

कव्हरवर फक्त एक क्लिक

आणि पुस्तक हजर






**मित्रहो, पुस्तकं वाचून कोणी शहाणं होतं का?**

हो! आम्ही म्हणतो वाचनाने माणूस शहाणं होतं. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. प्रत्यक्ष अनुभवासारखा शिक्षक नाहीच. इतर प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात. पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला पुर्वी जगलेल्या आणि आता जिवंत नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा. वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे. एक एक पुस्तक म्हणजे व्हिटामिनची एक एक गोळी असते असं समजा. शहाणं करून सोडणारं व्हिटामिन. आणि जसे इतरांचे अनुभव तुम्हाला शहाणं करतात तसे तुमचे अनुभव इतरांना सांगून त्यांना शहाणं करायचं काम तुम्ही करू शकता. तुम्ही तुमचे अनुभव लिहून ई साहित्यकडे पाठवा. बाकी सर्व आम्ही बघू.

मंडळी!

वाचायला तर हवंच!

पण वाचून झाल्यावर प्रतिसादायलाही हवं...

...आणि स्वतःही लिहायला हवं.

www.esahity.com

www.esahity.in